कला अकादमी गोवा
पणजी-गोवा

कअ/हिंसंवि/२०२६-२७/१५९५
दि. १३/१०/२०२६

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीच्या हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे शारदोत्सवानिमित्त, "प्रतिभा" संगीत सभा आयोजित करण्यात आली आहे. दि. १७ ऑक्टोबर २०२६ रोजी कला अकादमीच्या कृष्णकक्षात दुपारी ठिक २.१५ वाजता गायन वादन व नृत्याचा कार्यक्रम होणार आहे. त्यामध्ये सर्वप्रथम कु. निष्ठा साळगांवकर, कु. सान्वी गांवकर, कु. सियोन नाईक, कु. श्रीनिधी सर्वणकर, कु. आरुष पालेकर, कु. स्मयन पांगम हे विद्यार्थी शारदास्तवन सादर करतील. त्यानंतर श्री. गौरेश परब, श्री. सुरज मळिक, श्री. रत्नपाल लोटलीकर यांचे संवादिनी वादन होईल. तद्‌नंतर सुगम संगीताच्या कार्यक्रमात कु. सत्यनारायण कळंगुटकर, कु. सदानंद झो, कु. राज्ञी फळदेसाई, कु. वरद तारी, कु. उगम सावंत, कु. अवनीश लिंगडकर व कु. उत्कर्षा तारी हे विद्यार्थी सहभागी होणार आहेत व त्यांना श्री. संतूर नाईक व कु. कौस्तुभ च्यारी (तबला), कु. उत्कर्षा फोंडेकर (संवादिनी) कु. दिप्तेज रेवोडकर (पखावज), कु. यश आपटे (बासरी), श्री. गौरेश परब (की-बोर्ड) कु. योगिराज पै (मंजिरी) यांची संगीत साथ तसेच श्री. ऋषिकेश सावंत यांचे निवेदन लाभणार आहे.

कथ्थक नृत्याच्या कार्यक्रमात कु. पियु निमकर, कु. अर्पिता पुनाजी, कु. आद्या जोशी, कु. मंजुश्री बांदोडकर, अनिंदिता सरवटे व कु. कल्याणी नाय रया विद्यार्थीनी सहभागी होणार आहेत. त्यांना श्री. प्रज्योत ताम्हणकर (तबला) श्री. शुभम नाईक (संवादिनी) कु. राज्ञी फळदेसाई (गायन) व सौ. वरदा बेडेकर (पढंत) यांची साथसंगत लाभणार आहेत. शेवटी कार्यक्रमाची सांगता कु. शिल्पा के, कु. निधी नाईक शिरोडकर, कु. अनुश्री कोली, कु. निर्मिती नाईक यांच्या भरतनाटयम नृत्याने होणार आहे.

सदर कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून सर्व संगीत रसिकांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे कळविण्यास येत आहे.

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)